!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# देवगिरी कन्या विद्यालय समर्थनगर येथे गरजु विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्यांचे वाटप

**संभाजीनगर : ( ता.०८ )** वॉर्ड क्र. ६८ समर्थनगर येथील देवगिरी कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात नगरसेवक ऋषिकेश खैरे यांच्या शुभहस्ते गरजु विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. इयत्ता १ ली ते १० वीच्या विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या साहित्यामध्ये स्कुल बॅग्स, नोटबुक आदि साहित्यांचे वाटन करुन १० वी गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक आनंद तांदुळवाडीकर, उपशहरप्रमुख हिरा सलामपुरे, महिला आघाडीच्या किरण शर्मा, कांता गाठे, माध्यमिक शाळेच्या मुख्याधिपिका देशमुख मॅडम, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक देशमुख, निलेश बोरखडे, सचिन जोशी आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांनी नगरसेवक ऋषिकेश खैरे यांनी शाळेच्या १० वी चा ९५ टक्के निकाल लागल्याने सर्व शिक्षकांचे कौतुक केले. सर्व सामान्य घरातील विद्यार्थ्यांना खुप अभ्यास, मेहनत करुन मोठे व्हावे, आई वंडिलांचे स्वप्न पूर्ण करुन. देशाचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन केले.

यावेळी किरण शर्मा यांनी मुलींना व महिलांना आत्मसंरक्षणाचे धडे घेऊन मनुष्यांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करावे. माजी नगरसेवक आनंद तांदुळवाडीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी भीमा दाभाडे, ललीत कुलकर्णी, अक्षय कुंटे, आदित्य राजपुत, गोविंद तांगडे, विशाल सालपे, आदिंसह स्थानीक नागरिकांची उपस्थिती होती.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400